**कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे.**
सिंचन भवन, कोपरी, ठाणे (पूर्व),४०० ६०३.
दूरध्वनी क्र. २५३२९७७६, फॅक्स २५३२९७६७
ई-मेल: edkidc.thanewrd@maharashtra.gov.in

**(ई-मेल द्वारे)**
जा.क्र. कोंपाविम/तां-४/वकील नियुक्ती/ ४५४ /सन २०२४ दि. : ०७/०२/२०२४

**प्रति,**

कार्यकारी अभियंता,
प्रशासन संगणकीकरण विभाग, जलसंपत्ती भवन,
कोथरुड- ३८

**विषय :-** कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे करार तत्वावर जिल्हा न्यायालयांसाठी वकीलांची नियुक्ती करीता जलसंपदा विभागाचे संकेतस्थळावर जाहिरात होणेबाबत.

**संदर्भ :-** महामंडळ कार्यालयाचे सहाय्यक संचालक (जाहिरात) यांना पत्र जा.क्र. कोपाविम/तां.४/वकील नियुक्ती जाहिरात/ ४५३ /सन २०२४, दि. ०७/०२/२०२४

कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे कार्यालयाकडून रायगड, ठाणे, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक या जिल्ह्यामधील विविध दिवाणी न्यायालयामधील तसेच कामगार न्यायालय, औद्योगिक न्यायालय, मोटार अपघात न्यायाधिकरण इत्यादी समोरील न्यायालयीन प्रकरण चालविणे करीता विविध ठिकाणच्या न्यायालयात/ न्यायाधिकरणात वकीलांची करार तत्वावर नियुक्ती करणे करीता संदर्भिय पत्रान्वये जाहिरात देणेत आली आहे. सविस्तर जाहिरात जलसंपदा विभागाचे संकेत स्थळ (website) www.wrd.maharashtra.gov.in वर जाहिरात प्रसिध्द करणे आवश्यक आहे. तरी संकेत स्थळावर जाहिरात टाकण्यात यावी ही विनंती.

(विनोद मुंजाप्पा)
कार्यकारी अभियंता
कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ,
ठाणे.

**स्थळ प्रत मा. कार्यकारी संचालक यांनी मंजूर केली आहे.**

सोबत :- १. कार्यालयीन माहिती प्रपत्र
२. जाहिरात पत्र
३. नियम व अटी
४. विधी- शुल्क / फी बाबत परिपत्रक
५. विहित प्रपत्रात अर्जाचा नमुना

mahabharti.in

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**जाहिरात**

सत्यमेव जयते

## कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे. सिंचन भवन, कोपरी, ठाणे (पूर्व) करार तत्वावर जिल्हानिहाय वकिलांची पटलावर नियुक्तीबाबत.

कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे कार्यालयाकडून रायगड, ठाणे, पालघर, रत्नागिरी, नाशिक या जिल्हयामधील विविध दिवाणी न्यायालयामधील तसेच कामगार न्यायालय, औद्योगिक न्यायालय, मोटार अपघात न्यायाधिकरण इत्यादी समोरील न्यायालयीन प्रकरण चालविणे करिता विविध ठिकाणच्या न्यायालयात/ न्यायाधिकरणात पटलावरील वकिलांची करार तत्वावर नियुक्ती करणे करिता दि. २०/०२/२०२४ ते दि. १०/०३/२०२४ या कालावधीत ई-मेलद्वारे kidclegal@gmail.com अर्ज मागविण्यांत येत आहे. सदर वकीलांचे पॅनल मध्ये नाव समाविष्ट करण्यासाठी आवश्यक पात्रता इतर अटी व शर्ती तसेच विधी शुल्काचे परिपत्रक इत्यादीं बाबतची सविस्तर माहिती महामंडळाच्या www.wrd.maharashtra.gov.in या (वेबसाईटवर) संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. अर्ज केवळ ई-मेलद्वारेच स्विकारले जातील. त्याबाबत कसलाही पत्रव्यवहार केला जाणार नाही. तसेच पुढील सर्व सुचनाही उपरोक्त संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. सध्याचे पॅनलमधील इच्छुक वकिल उमेदवारांनी देखील नव्याने अर्ज सादर करणे अनिवार्य राहील. (पॅनल वरील वकिलांना नेमून द्यावयाच्या कामकाजाचा अधिकार महामंडळास राहील.) अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्जांची छाननी करण्यात येईल व पात्र अर्जदारांना तोंडी मुलाखतीसाठी बोलवण्यात येईल.

**टिप :**

जिल्हे जेथे करार तत्वावर वकिलांचे पॅनल तयार करावयाचे आहे.

(१) रायगड (२) ठाणे (३) पालघर (४) रत्नागिरी (५) सिंधुदुर्ग (६) नाशिक

**स्थळ प्रत मा. कार्यकारी संचालक यांनी मंजूर केली आहे.**

(विनोद मुंजाप्पा)
कार्यकारी अभियंता
कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ,
ठाणे.

दिनांकः-
दूरध्वनी क्रः- ०२२-२५३२९७७६

mahabharti.in

mahabharti.in

सत्यमेव जयते

# Konkan Irrigation Developement Corporation, Thane
# (A Government of Maharashtra Undertaking)

## Terms and Condition for applying for the Panel Advocate of Distrcit Courts, Civil Administrative Court, MAT etc. for Konkan Irrigation Development Corporation Thane (KIDC Thane)

The Konkan Irrigation Developement Corporation, Thane; (KIDC) is constituted under Maharashtra ordinance No.XVII of 1997 passed by Government of Maharashtra.

The Konkan Irrigation Developement Irrigation Corporation hereby call for applicants for appointment of Advocates on it's panel in different courts.

### Eligibility Criteria

1. The Applicant should be practicing advocate and should have at least 5 years experience of conducting Civil, Criminal, Labour and Industrial, Service matters, as the case may be as on 01-03-2024 (However seniority in the profession will be considered as an additional qualification)
2. Applicant should submitt practice period certificate issued by Dist. court or concerred Bar Associtation.
3. Applicant shall submitt Marks memos of gradation of L.L.B. Examination.
4. Applicant should have knowledge and skill of communication by E-mail/internet /computerised system.
5. Applicant shall not have been debarred from practicing as an advocate for any period by Competant Authority.
6. Advocate working as Govt.Pleader/Additional Govt.Pleader /Asst. Govt. Pleader shall not be eligible to apply for Panel Advocate.

### Selection Procedure

7. Applicant should submit the application in prescribed format as given on website.
8. Every applicant shall submit non- refeundable Demand Draft of Rs. 100/- in favour of Executive Engineer, KIDC Thane Payble at Thane.
9. Applicant will be interviewed by a commiittee formed by Executive Director, KIDC Thane.
10. The period of empanalment on panel shall be 3 years initially and may be extended at the pleasure of Executive Director, KIDC Thane, considering the performance of concerned Advocate.
11. Resume & experience will be of 40 marks & Interview will be for 60 marks. Applicant securing less than 50% marks in total will not be selected.

mahabharti.in

12. No TA.-DA. or any other expenses shall be admissible or honored, if applicant opts to work in local or outstation Courts.
13. KIDC Thane reserves its right not to call any applicant for interview without assigning any reasons.
14. Canvassing for selection of the applicant in any way shall debar him from process of selection.
15. Incomplete application shall not be considered.
16. Eligible and suitable applicants will be informed by Email, the place, date and time of interview before interview committe. Applicants should bring original certificates regarding education qualification, "sanad" issued by Bar Council of Maharashtra and Goa, and marks memo of LLB examanation.
17. The decision of Executive Director, KIDC Thane.shall be final in the selection matter.
18. Reasons for selection or non selection will not be Intimated/ communicated to anybody.
19. No correspondence from applicants in this respect will be entertained.

**Terms and Conditions**

20. Selected Applicants Advocates will have to submit consent letter about terms and conditions in favour of Executive Director, KIDC Thane.
21. Applicant, if selected, shall not engage himself in any matter or case, inside or outside Court, against the interest of Konkan Irrigation Development Corporation (KIDC) Thane.
22. Selected Applicant will have to work in the case/matter assigned to him till the end of that case or until further instructions given by KIDC. In case of contrary instructions are issued, the panel advocate will have to give "No Objection Certificate" for conducting the matter further by any other Advocate appointed by KIDC and will have to hand over the brief with all papers and documents of case.
23. Selected Applicant will have to work with the fee structure exist at the time of assignment of case by KIDC.
24. Selected Applicant shall file case, in the court on behalf of KIDC, and as or proseate or defend case, at the earliest, and take all the further necessary steps in time

    and make a back reference to Executive Engineer concerned and Legal Adviser concerned of KIDC by Email within 3 Days, having done so along with details of case no, name of parties, date of filing and next stage in the matter.

25. Selected Applicant shall intimate in writting and by e-mail within 7 days from receipt of his appointment letter and case paper to Executive Engineer concerned and concerned Legal Adviser K.I.D.C regarding the Court fees, expenses and Advocate fee required to be paid at that stage, in concerned matter.
26. Selected Applicant shall file proceeding within 7 days from receipt of Court fee, Advocate fee, Expences etc to him and inform by e-mail the date of filing proceeding, number and next date in that case with stage of case to concern Executive Engineer and concern Legal Adviser, K.I.D.C without fail.
27. Selected Applicant shall also intimate the interim orders in the matter to concern Executive Engineer and Concern Legal Advisor, K.I.D.C. by e-mail without delay, and take further necessary actions needed in the matter without delay.



mahabharti.in

28. Selected Applicant shall also intimate the final order or decision of the case within 3 days from date of decision by e-mail to concerned Executive Engineer and concerned Lagal Advisor K.I.D.C with his opinion or comment.
29. Selected Applicant shall submit an application for certified copy of Interim order/Final order/Judgment within 3 days from the pronouncement and deposit the required copying fees/charges in Court/Tribunal, at the earliest and obtain copy without delay and send it to concern Executive Engineer and concern Legal Advisor K.I.D.C with his opinion immediately.
30. In case the Panel Advocate wants to withdraw from the panel of Advocates or from any case assigned to him, he will have to inform about it in writting at least one month before his withdrawal to concern Executive Engineer and concern Legal Advisor of K.I.D.C. In that case, he will have to give 'No Objection' and has to handover all the papers and documents of the pending cases to newly appointed/substituted advocates immidiatly and he shall not be entitled to further remaining profeesional / Advocate fees.
31. Selected Applicant shall follow all instructions, circulars, guidlines-rules of litigation issued by Legal Department of K.I.D.C. & Govt. of Maharashtra from time to time, without delay.

**<u>Legal Fees and Remunaration :-</u>**

32. Selected Applicant will get Legal fees as per existing prescribed circular of K.I.D.C, Thane.
33. Selected Applicant shall submit the final bill within 15 days from date of decision claiming his remaining Advocate fees plus copying fees incurred by him in the prescribed proforma to concern Executive Engineer.
34. Failure to act promptly by Selected applicant advocate leading to incurring losses to K.I.D.C will entitle to the removal of his name from panel and he will also be liable for the losses to K.I.D.C, if any. The decision of Executive Director, K.I.D.C shall be final and binding upon such advocate.
35. K.I.D.C also reserves its rights to engage additional Advocates or Sr. Advocates of special Council at any stage in any case.

mahabharti.in

**O.C. Approved by Executive Director**

Date:-

Place:-

Phone no:- 25329776

email:- edkidc.thanewrd@maharashtra.gov.in

website:- www.wrd.maharashtra.gov.in

Executive Engineer
Konkan Irrigation Developement Corporation,
Kopri colony, Thane (E)
Pin code- 400603

mahabharti.in

## KONKAN IRRIGATION DEVELOPMENT CORPORATION, THANE (E)

**APPLICATION FORM for Empanelment of Advocates.**

(To be filled by Applicant & sent by mail)

| | | |
|---|---|---|
| 1. | **Full Name of Applicant** | |
| 2. | **Date of Birth** | |
| 3. | **Address for Correspondence** | |
| 4. | **Phone No. & or Mobile No.** | |
| 5. | **E-Mail ID** | |
| 6. | **Educational Qualification** | |
| 7. | **Date & Registration number of 'Sanad' issued by the Bar Council of Maharashtra & Goa.** | |
| 8. | **Experience in years as practicing Advocate in court / courts** | |
| 9. | **Name of District for which application made** | |
| 10. | **Experience in type of cases & it's numbers** | |
| 11. | **Organisation for which applicant has worked/working** | |
| 12. | **Additional Information (if any)** | |
| 13. | **BANK D.D. No. & Date**<br>**Name of Bank** | |

Signature:-

Name:-

# कार्यालयीन टिपणी

**क्रमांक-** **दिनांक /०२/२०२४**

**विषय:- जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळावरती माहिती अपलोड करण्याबाबत.**

**अ)अपलोड करण्याबाबत मागणी करणाऱ्या कार्यालयाने भरावयाची माहिती**

| अ.क्र. | विषय | तपशिल |
|---|---|---|
| १ | अपलोड करण्यात येणाऱ्या फाईल/धारीकांचा विषय | कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे अंतर्गत करार तत्वावर जिल्हा न्यायालयासाठी वकील नियुक्ती करीता जाहिरात प्रसिध्दीबाबत. |
| २ | अपलोड करण्याबाबत मागणी करण्यात आलेले कार्यालयाचे नाव | कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे |
| ३ | अपलोड करण्या विषयी मागणी करण्यात आलेल्या पत्राचा दिनांक | दिनांक- /०२/२०२४ |
| ४ | माहिती किती कालावधीसाठी अपलोड करावयाची आहे ? () | दिनांक- २०/०२/२०२४ ते १०/०३/२०२४ |
| ५ | कारण :- | कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे कार्यालयाकडून रायगड, ठाणे, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक या जिल्ह्यातील विविध दिवाणी, कामगार, औद्योगिक, मोटार अपघात, हरित न्यायाधिकरण इ. न्यायालयीन प्रकरणे चालविणे करीता वकलांची करार तत्वावर नियुक्ती करणेसाठी. |
| ६ | संकेत स्थळावरती माहिती कोठे अपलोड करावी याचा तपशिल. (उद. पत्र पेटी, घटना व प्रकटने....) | मुख्य पृष्ठ (Home Page Employment) |
| ७ | अपलोड करण्यात येणाऱ्या फाईल/ धारिकांची संख्या | ०१ (एक) |

पुरविण्यात आलेली माहिती व संकेस्थळावरती अपलोड करण्यात येणारी कागदपत्रे तपासलेली असून ती अचूक असल्याची खात्री करण्यात आलेली आहे. सदर अपलोड होणाऱ्या कागदपत्रांची संपूर्ण जबाबदारी या कार्यालयाची राहिल.

विभाग प्रमुखाची स्वाक्षरी

| ब) प्रकल्प व्यवस्थापन कार्यालयाने भरावयाची माहिती | | |
|---|---|---|
| १ | मागणी कशाव्दारे प्राप्त झाली (पत्र/ई- मेल/दुरध्वनी) | |
| २ | कोठे अपलोड करण्याचे प्रस्तावित आहे ? | |
| | | |
| संकेतस्थळ व्यवस्थापक- अपलोडिंग<br>सहाय्यक अभियंता श्रेणी- २ | | |
| संकेतस्थळ व्यवस्थापक- प्रमाणीकरण<br>सहाय्यक अभियंता श्रेणी- १ | | |
| संकेतस्थळ संपादक<br>कार्यकारी अभियंता (प्रशासकन संगणकीकरण विभाग) | | |
| मंजुरी<br>अधीक्षक अभियंता, ई-प्र.मं.मुंबई | | |

प्रतिलीपी- विभागाचे नाव

टीप- सदर प्रपत्र भरुन खालील ई- मेल पत्त्यावर पाठविण्यात यावे-,

1) eeacd.punewrd@maharashtra.gov.in
2) sdeportal.pmo@gmail.com

कार्यालयीन फोन क्रमांक व पत्ता- ०२०- २५४६८९८२ (कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणकीकरण विभाग, जलसंपत्ती भवन, कोथरुड, पुणे- ३८)

# <u>कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे</u>

**महामंडळांतर्गत विविध न्यायालयातील प्रकरणे हाताळण्यासाठी (अ) उच्च न्यायालय/ राष्ट्रीय हरीत लवाद/ राज्य मानवी हक्क आयोग, (ब) जिल्हा स्तर न्यायालय /तालूका स्तर न्यायालय/ महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (MAT)/ जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, (क)विधी विषयक सल्ला घेण्यासाठी महामंडळाच्या पॅनलवरील वकीलांच्या विधी शुल्काचे दरपत्रकानुसार अदायगी होणेबाबत.**

## परिपत्रक

संदर्भ : कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे नियामक मंडळाची, ८० वी बैठक, ठराव क्र.८०/९ (८०/१०), दि.१२/०४/२०२१.

कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे अंतर्गत सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय, जिल्हा न्यायालय, जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, हरित लवाद इत्यादी ठिकाणी विविध न्यायालयीन प्रकरणे चालू आहेत. या न्यायालयीन प्रकरणांमध्ये महामंडळाच्यावतीने बाजू मांडण्यासाठी विहित निवड प्रक्रियेचा अवलंब करून वकीलांचे पॅनल तयार करण्यात आले आहे. तथापि मंजूर करण्यात आलेली फ़ी संरचना अनियमित असून, फ़ीची समान संरचना असणे आवश्यक असल्याने न्यायालयीन स्तर निहाय दर नियामक मंडळाच्या ८० व्या बैठकीत दि.१२/०४/२०२१ रोजी प्रस्तावित करण्यात आले होते. त्यानुसार ठराव क्र.८०/९ अन्वये नियामक मंडळाने दि.१२/०४/२०२१ रोजी एकमताने मान्यता दिलेली असल्याने यापूर्वीचे मंजूर केलेले विधी शुल्काचे सर्व दर अधिक्रमित करून खालील प्रमाणेच्या दराने, विधी शुल्काची अदायगी करण्यात यावी.

**<u>अ) उच्च न्यायालय/ राष्ट्रीय हरीत लवाद/ राज्य मानवी हक्क आयोग :-</u>**

| अ.क्र. | तपशिल | प्रस्तावित विधी शुल्क |
|---|---|---|
| १ | उत्तराचा मसुदा तयार करून दाखल करणे | प्रति प्रकरण २०,०००/- |
| २ | न्यायालयात हजर राहून बाजू मांडणे | प्रति सुनावणी ७,५००/- |
| ३ | न्यायालयात हजर असून सुनावणी न होणे | प्रति सुनावणी ३,७५०/- |
| ४ | सल्लामसलत शुल्क (Conference Charges) | प्रति तास २,०००/- |
| ५ | अतिरिक्त अपीलाच्या उत्तराचा मसूदा तयार करणे | प्रति प्रकरण १०,०००/- |
| ६ | साधन सामग्री (Office expenses) | २०% of Total Bill |

**ब) जिल्हा स्तर न्यायालय /तालूका स्तर न्यायालय/ महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (MAT)/ जलसंपत्ती नियमन प्राधिकरण :-**

| अ.क्र. | तपशिल | प्रस्तावित विधी शुल्क |
|---|---|---|
| १ | उत्तराचा मसुदा तयार करून दाखल करणे | प्रति प्रकरण ८,०००/- |
| २ | न्यायालयात हजर राहून बाजू मांडणे | प्रति सुनावणी ३,०००/- |
| ३ | न्यायालयात हजर असून सुनावणी न होणे | प्रति सुनावणी १,५००/- |
| ४ | अतिरिक्त अपीलाच्या उत्तराचा मसूदा तयार करणे | प्रति प्रकरण ४,०००/- |
| ५ | साधन सामग्री (Office expenses) | २०% of Total Bill |

क) **महामंडळांतर्गत प्रकरणासाठी विधी विषयक सल्ला घेण्यासाठी रु. २००००/- प्रती प्रकरण सल्ला मसलत शुल्क (Conference Charges) रु. २०००/- प्रती तास.**

❖ **पॅनलवरील वकीलांना द्यावयाच्या विधी शुल्काबाबत खालीलप्रमाणे अटी व शर्ती असतील :-**

१. महामंडळाने ठरवून दिलेल्या शुल्कामध्ये प्रकरणासाठी लागणाऱ्या संपूर्ण कालावधीत काम करावे लागेल.

२. वकीलाने शासन / महामंडळाचे हित जोपासण्यासाठी जाणीव पुर्वक व सप्रमाण (Evidence) युक्तीवाद मा.न्यायालयासमोर करणे बंधनकारक आहे. त्यासाठी सर्व आवश्यक कागदपत्रे, पुरावे, कायद्यातील तरतूदी, सर्वोच्च न्यायालयाचे निकाल इत्यादी सर्वांचा अभ्यास करुन न्यायालयासमोर मांडणी करावी व शासनाच्या बाजुने निकाल लावण्यासाठी प्रयत्नशील रहावे.

३. महामंडळाच्या अहिताचे कामे केल्यास / केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित वकीलांची नियुक्ती रद्द केली जाईल.

४. न्यायालयीन प्रकरणासाठी प्रवास खर्च वकीलांनी स्वत: करावयाचा आहे. प्रवासभत्ता देणे महामंडळास बंधन कारक राहणार नाही.

५. नेमुन दिलेल्या जिल्हयातील महामंडळ अधिकाऱ्यांनी दिलेली प्रकरणे हाताळावी लागतील.

६. मा.सर्वोच्च न्यायालयात / उच्च न्यायालयातील प्रकरणा मधील विलंब क्षमापित करणे (Delay Condonation) या कारणामुळे अथवा इतर कोणत्याही कारणाने प्रकरण दाखल करतांना (Admission Stage) ते प्रकरण निकाली निघाली / खारीज (Dismiss) झाले तर पॅनलवरील वकीलांना एकूण विधी शुल्का पैकी प्रकरणे न्यायालयात दाखल करतांना प्रथम टप्प्यात अदा केलेल्या शुल्का व्यतिरिक्त उर्वरित फी देण्यात येणार नाही.

७. अटी शिथील करण्याचा किंवा नविन अटी करण्याचा अधिकार महामंडळास राहील.

८. आवश्यकता भासल्यास संबंधित जिल्हयातील अधिकारी वकीलांशी संपर्क साधतील तेव्हा त्यांना कायदेशीर सल्ला द्यावा लागेल.

९. कैफीयत न्यायालयात वेळेवर सादर होईल हे पाहण्याची जबाबदारी वकीलांची राहील. प्रत्येक तारखेस न्यायालयात हजर राहून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संबंधित अधिकाऱ्यांना व त्यांच्या कार्यालयास आवश्यक माहिती बाबत पत्राद्वारे कळवावा लागेल.

१०. वकीलपत्र देण्यापूर्वी संबंधीत वकीलांना वरील दराने व नमूद केलेल्या टप्पा प्रमाणे शुल्क अदा केले जाईल याबाबत अवगत करावे व त्यांची संमती घ्यावी.

११. विधी शुल्क निधी मागणी करतांना संबंधीत वकीलांनी केलेली कामगिरी समाधानकारक असल्याबाबतचे कार्यकारी अभियंता व अधीक्षक अभियंता यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**स्थळप्रत मा.कार्यकारी संचालक यांनी मंजूर केली आहे.**

जा.क्र. कोपाविम/ तां-४/ ९८६९ /२०२१
कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे.
सिंचन भवन, कोपरी, ठाणे.
दिनांक : ०८ /०६ / २०२१

(प्र. तु. पवनारकर)
कार्यकारी अभियंता (प्रभारी),
कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ,
ठाणे.

प्रत :- मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोंकण प्रदेश, हाँगकाँग बँक बिल्डींग,४ था मजला, हुतात्मा चौक, मुंबई ४०० ००१ यांना माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी.

प्रत :- अधीक्षक अभियंता,

१. उत्तर कोकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ,कळवा-ठाणे.
२. दक्षिण कोकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ,ओरोस.
३. ठाणे पाटबंधारे मंडळ, ठाणे.
४. कोंकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ, कुवांरबाव रत्नागिरी.

..... यांना माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी.

प्रत : कार्यकारी अभियंता,

१. ठाणे पाटबंधारे विभाग, कळवा, जि. ठाणे. (सिंचन)
२. भातसा धरण व्यवस्थापन विभाग, भातसानगर. (सिंचन)
३. पालघर पाटबंधारे विभाग मनोर, जि. पालघर. (सिंचन)
४. रायगड पाटबंधारे विभाग कोलाड, जि.रायगड. (सिंचन)
५. नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक, जि. नाशिक.
६. रायगड पाटबंधारे विभाग क्र.२, कोंकण भवन, नवी मुंबई.
७. हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली, जि. रायगड.
८. पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग, शहापूर, ता. शहापूर जि. ठाणे.
९. पालघर पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग, सुर्यानगर, ता. डहाणू, जि. ठाणे.
१०. पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग, रत्नागिरी.

११. पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग, चिपळूण, जि. रत्नागिरी.
१२. रत्नागिरी पाटबंधारे विभाग, रत्नागिरी. (सिंचन)
१३. सिंधुदूर्ग पाटबंधारे विभाग, आंबडपाल, जि. सिंधुदूर्ग. (सिंचन)
१४. मध्यम प्रकल्प विभाग, आंबडपाल, जि. सिंधुदूर्ग.
१५. लघु पाटबंधारे विभाग, ओरोस, जि. सिंधुदूर्ग.
१६. सिंधुदूर्ग पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग, चराठे, सावंतवाडी, जि. सिंधुदूर्ग.

..... यांना ई-मेलव्दारे माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी.

प्रत :- कार्यासन- तांत्रिक १, तांत्रिक २, तांत्रिक ३, तांत्रिक ५, तांत्रिक ६ , तांत्रिक ७, तांत्रिक ८, लेखा व आस्थापना यांना ई-मेलव्दारे माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी.